# महाराष्ट्र शासन

क्र. मअसे/५५-बी/२०१६/४५१

टेलि : २६६७ ७५५५
फॅक्स : २६६६ ०२८७

Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.

दिनांक : २९.०३.२०१६

प्रति,
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका.
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा/नगर पंचायती,
मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका,
अन्य अग्निशमन सेवांचे प्रमुख.

विषय :दि.१४ ते २० एप्रिल,२०१६ या कालावधीत
**अग्निशमन सेवा सप्ताह** पाळणेबाबत.

महोदय,

दिनांक १४ एप्रिल,१९४४ रोजी मुंबई गोदीत **एस. एस. फोर्ट स्टिकिन** या जहाजाला स्फोट होवून लागलेल्या भीषण आगीशी झुंज देताना अग्निशमन दलाच्या ६६ जवानांना हौत्याम्य प्राप्त झाले तसेच त्यानंतरही अग्निशमनाचे कार्य करताना प्राणांची आहुती देणा-या अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच जनतेमध्ये अग्निशमनाबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रतिवर्षी केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सुचनेनुसार संपूर्ण देशात दिनांक १४ ते २० एप्रिल या कालावधीत **अग्निशमन सेवा सप्ताह** पाळण्यांत येतो. यावर्षी दिनांक १४ ते २० एप्रिल, २०१६ या कालावधीत पाळण्यांत येणा-या अग्निशमन सेवा सप्ताहाचे केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेले घोषवाक्य अनुक्रमे पुढील प्रमाणे आहे. या घोषवाक्यास या सप्ताहामध्ये पोस्टर्स, बॅनर्स तसेच विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्यांत यावी.

**इंग्रजी - " PREVENT FIRE ACCIDENT – PROMOTE NATION'S DEVELOPMENT "**

**हिंदी - "आग की दुर्घटनायें रोकें – देश की प्रगती में भागी बनें"**

**मराठी - "आगीच्या दुर्घटना टाळा – देशाचा विकास वाढवा "**

०२. अग्निशमनाबाबत राज्यातील जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी अग्निशमन सेवा सप्ताहाचे उदघाटन व अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याणनीधी संकलन मोहिमेचा शुभारंभ दि.१४ एप्रिल, २०१६ रोजी मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते राजभवन येथे करण्याचे प्रस्तावित आहे. नियमित अग्निशमन सेवेतील कर्मचारी तसेच औद्योगिक अग्निशमन सेवेतील कर्मचा-यांसाठी विविध फायर ड्रिल स्पर्धा, राज्यातील इयत्ता ५ ते ९ च्या शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध व चित्रकला स्पर्धा या कार्यालयातर्फे आयोजित केल्या जातात. तसेच वर्तमान पत्रे, दूरदर्शन, रेडिओ अशा विविध प्रसार माध्यमांद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन जनतेमध्ये जनजागृती केली जाते. या सप्ताहाच्या समारोप प्रसंगी विविध अग्निशमन सेवांचे संयुक्त संचलन आयोजित करुन प्रमुख अतिर्थीना मानवंदना दिली जाते. याप्रसंगी प्रमुख अतिर्थीच्या हस्ते विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे प्रदान केली जातात. आपणही आपल्या कार्यक्षेत्रात अग्निशमनाबाबत व्याख्याने, प्रात्यक्षिके, प्रदर्शने, विविध स्पर्धा आयोजित करुन हा अग्निशमन सेवा सप्ताह परिणामकारक पाळून जनतेमध्ये अग्निशमन प्रतिबंधात्मक जनजागृती करण्यांत यावी. तसेच या अग्निशमन सेवा सप्ताहात स्थानिक वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन इत्यादी विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्यांत यावी.

०३.		हा अग्निशमन सेवा सप्ताह यशस्वीपणे पाळण्यासाठी या कार्यालयाकडून **पीन फलॅग,** पोस्टर्स आणि अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याणनिधी जमा करण्यासाठी डोनेशन बॉक्सेस, इत्यादी सामुग्री आपणांस पुरविण्यांत येईल. बृहन्मुंबई, ठाणे जिल्हयातील व जवळपासच्या अग्निशमन सेवांनी वरील साहित्य या कार्यालयाकडून प्रत्यक्ष घेवून जाण्याची व्यवस्था करावी ही विनंती. या सप्ताहात सदर पीन फलॅग जनतेस प्रदान करुन जनतेकडून, विविध आस्थापनांकडून तसेच अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांचेकडून जास्तीत जास्त अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याणनिधी उभारण्याची मोहिम यशस्वीपणे राबविण्यांत यावी. जमा केलेला ***हा कल्याणनिधी "The Maharashtra Fire Services Personnel Welfare Association" यांचे नावे काढलेल्या व मुंबईमध्ये देय होणा-या डिमांड ड्राफ्टने दिनांक ३० एप्रिल,२०१६ पर्यंत या कार्यालयास पाठविण्यांत यावा.*** ज्या **महानगरपालिका/नगर परिषदा अग्निशमन सेवा सप्ताहात कल्याणकारी निधीसाठी निधी जमा करणार नाहीत त्या महानगरपालिका/नगर परिषदांनी रिकामे डबे या संचालनालयास परत पाठवावयाचे असून कल्याणकारी निधी का जमा केला नाही याचा सविस्तर खुलासा या कार्यालयास करणे अनिवार्य आहे.** या असोसिशनला देण्यांत येणारे डोनेशन हे आयकर अधिनियम, १९६१ च्या सेक्शन ८०-जी अंतर्गत आयकर मुक्त आहे. हा कल्याणनिधी या वेल्फेअर असोसिएशनचे सभासद असलेल्या राज्यातील अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी वैद्यकिय/आर्थिक मदत तसेच त्यांच्या गुणवंत मुलांना शिष्यवृत्ती अश्या विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरण्यांत येतो. आपल्या अग्निशमन सेवेतील अधिकारी / कर्मचारी यांना या असोसिएशनचे सभासद होण्यास उद्युक्त करावे.

०४.		सर्व महानगरपालिका / नगर परिषदा/नगर पंचायती यांनी तसेच आद्योगिक इतर सर्व क्षेत्रातील अग्निशमन सेवांनी आपल्या कार्यक्षेत्रात **अग्निशमन सेवा सप्ताह** प्रभावीपणे पाळून आगीपासून निर्माण होणारे धोके टाळण्यासाठी घ्यावयाची दक्षता व त्यावरील उपाययोजना याबाबत जनतेमध्ये मोठया प्रमाणावर जनजागृती करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कल्याणनिधीच्या डिमांड ड्राफ्टसह या कार्यालयास अग्निशमन सेवा सप्ताहानंतर १० दिवसांत पाठविण्यांत यावा, जेणेकरुन एकत्रित अहवाल केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांना पाठविणे शक्य होईल.

आपला विश्वासू,

**( एम.व्ही.देशमुख )**
अग्निशमन सल्लागार
महाराष्ट्र शासन.

**प्रत :** माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर / अग्रेषित.

१.	मा.सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२.	महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३.	सर्व विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य.
४.	मा.जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
५.	आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रधासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०२५.
६.	संचालक, मुंबई दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई-४०० ०३०.
७.	संचालक, आकाशवाणी केंद्र, आमदार निवाससमोर, मुंबई-४०० ०२०.